मासिक
# स्वराज दुनिया

संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०

■ RNI/PRGI No. : MAHMAR/2024/89748
■ DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
■ unoindia1977@gmail.com

■ वर्षे २ रे ■ अंक ११ ■ जानेवारी २०२६ ■ मुल्य : २५ रु ■ वार्षिक वर्गणी : २५० रु. 

# जीव कोणाचा महत्त्वाचा, शेतकऱ्यांचा की हिंस्र प्राण्यांचा?

**वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात अनेक शेतकरी जखमी झाले तर काहींना प्राणही गमवावा लागला आहे. आपल्यावर कोणी व्यक्तीने मृत्यूस कारणीभूत ठरू शकणारा हल्ला केल्यास आपण त्या हल्लेखोराला ठार मारू शकतो. पण एखाद्या प्राण्याने हल्ला केल्यास कायद्याचे संरक्षण नाही, हा मोठा विरोधाभास आहे.**



**सतीश देशमुख**
**९८८१४९५५१८**

पिकांवर पडणारा किडीचा प्रादुर्भाव, १ शेतकऱ्यांना लुटणारे व्यापारी, अन्यायकारक धोरण राबवणारे शासन, वेळी-अवेळी पडणारा पाऊस, बदलते हवामान, घासाघीस करणारे शहरी ग्राहक अशी लांबलचक यादी आहे, ज्यांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात भर आहे वन्यजीव प्राण्यांची. वन्य प्राणी जसे रानडुक्कर, मोर, तरस, गवा, लांडगे, हत्ती, अस्वल, रोही, काळवीट, वानर, वाघ, बिबटे, रानकुत्रे, मगर यांच्या उपद्रवाने शेतकरी खूप त्रस्त झालेला आहे, दहशतीमध्ये वावरत आहे. आंबेगाव, जुन्नर, शिरूर भागांत बिबट्यांच्या हल्ल्यात अनेक शेतकऱ्यांना प्राण गमवावे लागल्याच्या बातम्या दररोज येतात. कोल्हापूर भागात मोर, वानरे पिके फस्त करीत आहेत. मराठवाड्यात रानडुकरे रात्रीत झुंडीत येऊन हातातोंडाशी आलेले पिके उद्ध्वस्त करीत आहेत. चंद्रपूर भागात वाघाची दहशत आहे... कोकणात हत्ती धुमाकूळ घालून नारळ, केळी, बांबू, भात पिके, फळझाडांचे नुकसान करीत आहेत. गडचिरोलीमध्ये हत्तीच्या आक्रमणाने घरे, झोपड्या उद्ध्वस्त होत आहेत. ओडिशामध्ये गेल्या दहा वर्षांत हत्तीच्या हल्ल्यात ९२५ जणांचा मृत्यू झाला व २१२ जणांना अपंगत्व आले.

महाराष्ट्रात गेल्या चार वर्षांत हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यात ३४८ शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे. २०२२ मध्ये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात गाय, म्हैस, शेळी, मेंढी असे ७०२१ पाळीव प्राणी दगावले आहेत. मालमत्ता, पीक नुकसान व जखमींचा तर हिशेबच नाही. 'वन्यजीव संरक्षण अधिनियम - १९७२' कायद्यामुळे या प्राण्यांना मारताही येत नाही. कायद्याप्रमाणे (IPL Section 100) आपल्यावर कोणी व्यक्तीने मृत्यूस कारणीभूत ठरू शकणारा हल्ला केल्यास आपण त्या हल्लेखोराला ठार मारू शकतो. पण एखाद्या प्राण्याने हल्ला केल्यास कायद्याचे संरक्षण नाही. हा किती मोठा विरोधाभास आहे. मानव वन्यजीव संघर्षामध्ये प्राणिप्रेमी नेहमी अशी दिशाभूल करतात, की प्राण्यांच्या अधिवासात मनुष्याचा हस्तक्षेप वाढला आहे. हे चुकीचे आहे. खरी कारणे वन्यप्राण्यांची वाढती संख्या, जंगलातील त्यांच्या भक्ष्याची कमतरता व आटलेले पाणी स्रोत ही आहेत. आम्ही जुन्नर भागात दौरा केला तेव्हा असे लक्षात आले, की या भागात मनुष्य व बिबट्याने एकमेकांचे सहअस्तित्व नाइलाजाने स्वीकारले आहे. तिथल्या स्थानिकांनी सांगितले, की इथे संध्याकाळी सात वाजेपर्यंत माणसाचे राज्य व सातच्या नंतर बिबट्यांचे राज्य असते. काही लोक पारावर गप्पा मारत असताना पलीकडे काही अंतरावर बिबट्या मांजरीसारखा बसलेला दिसतो. एका शेतकऱ्याच्या आईला त्याच्या नजरेसमोर बिबट्याने पळवून नेले. त्याच्या दुःख वेदना ऐकल्या आहेत. नुकसानभरपाई देताना


अधिकाऱ्यांनी तीस हजार रुपयांची मागणी केली. पाटण भागात आम्ही दौरा केला तेव्हा ग्रामस्थांनी सांगितले, की ७० टक्के लोकांनी शेती सोडून स्थलांतर केले आहे. पीक नुकसान भरपाईसाठी अधिकारी दुसऱ्यांदा पंचनामा करत नाहीत. ग्रामीण भागातील जगणे अत्यंत संघर्षमय झालेले आहे.

शेतकऱ्यांना वावरात मुक्तपणे / निर्भयपणे वावरण्याचे स्वातंत्र्य नाही, हे घटनेने दिलेल्या मूलभूत हक्काचे उल्लंघन आहे. वन्यप्राणी प्रेमी 'रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट'च्या संस्थापिका नेहा पंचमिया म्हणतात, याकडे समस्या म्हणून बघण्यापेक्षा आपल्याला वन्य प्राण्यांबरोबर सहअस्तित्व स्वीकारावे लागेल. हे शहरातील वन्य प्राणिप्रेमी पौर्णिमेच्या चांदण्या रात्री मचाणावर बसून 'निसर्गानुभव' घेऊन प्राणी गणना करणार. वन्य प्राणिप्रेमी संघटनांनी बिबटयाग्रस्त भागात राहून, रात्री उसाच्या शेतात पाणी द्यायला जाऊन दाखवावे. शहरातील प्राणिप्रेमी 'विचारवंता'ला एखाद्या बिबट्याने नरड्याला धरून फरफटत ओढून नेले तर कसे वाटेल, याचा विचार त्यांनी करायला हवा.

अशी भीषण परिस्थिती मूळ प्रश्नावर उपाययोजना न करता शासन प्रबोधनपर उपक्रम, इलेक्ट्रिक फॅन्सिंग योजना, कृती दलाची स्थापना, नुकसान भरपाईबद्दल नवीन कायदा अशी दिशाभूल करीत आहेत. 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' या संस्थेने मानवी मुखवटे करून चेहऱ्याच्या मागच्या बाजूला लावा म्हणजे संरक्षण होईल असे हास्यास्पद प्रयोग सुरू केले आहेत. दुसऱ्या एका कंपनीने गळ्यात बांधायला काटेरी पट्टे बनवून सादरीकरण केले आहे. वन खात्याने फ्लेक्स लावून नागरिकांनी सतर्क राहून वनविभागाला हल्ला झाल्यास तातडीने माहिती द्यावी, स्वतः चे व प्राण्यांचे रक्षण कसे करावे अशी जनजागृती (?) सुरू केली आहे. शासन सांगते आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने मानव वन्यप्राणी संघर्ष टाळणार; कसे माहीत नाही. बिबटयाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी कृत्रिम प्रज्ञेचा (AI) वापर करून हल्ले थांबणार आहेत का? 'बिबट्या हल्लेमुक्त अभियान' राबविणार म्हणजे काय? त्यांनी सांगितले, की सौर कुंपणाचा प्रयोग पथदर्शी व यशस्वी ठरला आहे. शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयाने स्वतःला तुरुंगात कोंडून घ्यायचे आहे का? त्यांनी आंबेगव्हाण, जुन्नर येथील प्रायोजित बिबटया सफारीसाठी अर्थसंकल्पात तरतूदच केलेली नव्हती. धक्कादायक म्हणजे एवढ्या प्रलंबित व बहुचर्चित सफारीमध्ये फक्त बारा बिबट्यांची सोय होणार आहे. त्या भागातील बिबट्यांची संख्या आहे अंदाजे ५००.

**(लेखक 'फोरम फॉर इंटलेक्चुअल्स' चे अध्यक्ष आहेत.)**





## शेतकऱ्यांच्या मागण्या

- **अमेरिका व इतर आठ देशात जीवन, स्वातंत्र्य मालमत्तेच्या व स्वसंरक्षणासाठी शस्त्रे बाळगण्याचा लोकांसाठी कायदेशीर अधिकार आहे. त्या कायद्याप्रमाणे 'Right to Gun' असा कायदा करून शेतकऱ्यांना स्वरक्षणासाठी हिंस्र प्राण्यांना मारण्याची परवानगी देण्यात यावी.**
- **'वन्य जीव संरक्षण अधिनियम' मध्ये सुधारणा करून प्राणी मानवजातीला घातक आहेत, शेतीचे नुकसान करतात व जे नामशेष होण्याच्या मार्गावर नाहीत, त्यांना परिशिष्टाच्या यादीतून (Schedule, Part 1) वगळावे, जेणेकरून मानवाला त्या प्राण्यांची मुक्तपणे शिकार करता येईल. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी सुद्धा वन्य प्राण्यांच्या शिकारीला नियंत्रित परवानगी हवी, अशी मागणी केली आहे.**
- **पंचवीस जणांची शूटरची एक टीम तयार करून त्यांच्यामार्फत ज्या ठिकाणी नरभक्षक वन्य प्राणी नागरी वस्तीत येऊन हल्ला करीत आहेत, त्यांची गोळ्या घालून हत्या करण्यात यावी.**
- **दक्षिण आफ्रिकेतील नामिबियातून बारा चित्ते आयात केले होते. त्यापेक्षा महाराष्ट्रातील बिबटे, वाघ बाहेरील देशात निर्यात करावेत.**
- **महाराष्ट्र शासनाने किमान पाच नवीन वन्यप्राणी रिसोर्टची आर्थिक तरतूद करून तीन वर्षांत ते प्रकल्प पूर्ण करावेत. व नागरी वस्तीतील प्रवेश करणाऱ्या वन्य प्राण्यांना पकडून तिकडे नेऊन सोडावे. तोपर्यंत भारतातील इतर राज्यातील अभयारण्य / रिसॉर्टमध्ये ही हिंस्र जनावरे पाठवावीत.**
- **कुंपणातील वीज प्रवाहामुळे काही जनावरे दगावल्यास शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल होतो. ती तरतूद रद्द करण्यात यावी.**
- **ग्रामीण भागात दिवसा वीजपुरवठा करावा.**

# संपादकीय

## बंडोबांचे आव्हान !

महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मंगळवार (३० डिसेंबर) ही अंतिम तारीख असून सर्वच राजकीय पक्षांनी बंडखोरी टाळण्यासाठी लपवाछपवीचा मार्ग स्वीकारला आहे. कारण त्यांच्यासमोर बंडोबांचे आव्हान कायम आहे. विशेष म्हणजे ही बंडखोरी सर्वपक्षीय आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतही तेच चित्र आहे. सोमवारी उमेदवारांची यादी जाहीर होऊ लागल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांत बंडखोरी उफाळून आली. त्यामुळे बंडखोरांची नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान राजकीय पक्षांसमोर उभे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सोमवारी दुपारनंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.), ठाकरे सेना व मनसे यांनी आपले काही उमेदवार जाहीर केले. मात्र यात काही निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले गेल्याने सर्वच राजकीय पक्षांतील इच्छुकांनी नाराजीचा सूर आळवला. राष्ट्रवादी काँग्रेसचे (श. प.) मुंबईतील जे मोजके माजी नगरसेवक होते, त्यातील मुंबई अध्यक्ष राखी जाधव, बबन कनावजे, धनंजय पिसाळ, मनीषा रहाटे या चारही माजी नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन दुस-या पक्षात प्रवेश केला. राखी जाधव यांनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. राखी जाधव यांनी भाजपात प्रवेश केल्याने भाजपची घाटकोपरमध्ये ताकद वाढली आहे. राखी जाधव २०१२ व २०१७ च्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १३१ मधून निवडून आल्या होत्या. मनसे नेत्या स्नेहल जाधव, भाजप नेत्या अर्चना पाटील यांनी ठाकरे सेनेत प्रवेश केला. ठाकरे सेनेचे चंद्रकांत वायंगणकर यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. ठाकरे गटात प्रभाग क्र. ९५ च्या उमेदवारीवरून आमदार अनिल परब आणि वरुण सरदेसाई यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. परब माजी नगरसेवक चंद्रकांत वायंगणकर यांच्यासाठी आग्रही होते,

तर सरदेसाई यांनी दिवंगत नेते श्रीकांत सरमळकर यांच्या जावयासाठी अर्ज मागितल्याने परब संतप्त झाले. अखेर परब यांनी माघार घेतल्याने शास्त्री यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. मात्र, या वेळी परब आणि सरनाईक यांच्यातील अंतर्गत मतभेद समोर आले. मुंबई महानगरपालिकेवर भगवा झेंडा फडकवण्यासाठी उमेदवारी जाहीर करताना भाजपने सावध भूमिका घेतली आहे. सोमवारी भाजपने ६६ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सुरुवातीला २२७ पैकी दीडशेहून अधिक जागा लढण्याची भाजपची तयारी होती. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची कोंडी झाली होती. शिवसेनेने याबाबत नाराजी व्यक्त केल्यानंतर दोन्ही पक्षांत ८-१० दिवसांपासून बैठकांचे सत्र सुरू होते. अखेर भाजप आणि शिवसेनेत २०७ जागांवर एकमत झाले. भाजपच्या पहिल्या यादीत ठाकरेंच्या शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करत नुकताच भाजपात प्रवेश केलेल्या तेजस्वी घोसाळकर यांना प्रभाग क्र. १ मधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

तसेच भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांचे पुत्र नील सोमय्या यांना वॉर्ड क्र. १०७ मधून तिकिट देण्यात आले आहे. २०७ जागांपैकी १२८ जागा भाजप लढवणार आहे, तर शिवसेनेच्या वाट्याला ७९ जागा आल्या आहेत. अजून २० जागांवर दोन्ही पक्षांमध्ये तोडगा निघालेला नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांचे निकटवर्तीय आणि भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांना मानखुर्द शिवाजीनगरच्या प्रभाग क्र. १३५ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. युवा मोर्चा अध्यक्ष तेजिंदरसिंग यांना मुंबईतील वॉर्ड क्र. ४७ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे सेनेने सोमवारी सायंकाळपर्यंत अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर न करताच निश्चित १२५ उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. उमेदवार पळवापळवी टाळण्यासाठी ठाकरे सेनेने महायुतीला चकवा देत एबी फॉर्मचे गुपचूप वाटप केले. ठाकरे सेना १५० जागा लढवणार आहे म्हणे. मनसे ७० जागा लढवणार आहे. मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसने सोमवारी ८७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.

या यादीत खासदार चंद्रकांत हंडोरे यांची कन्या प्रज्योती हंडोरे यांना प्रभाग क्र. १४० मधून उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच आमदार अस्लम शेख यांच्या मुलाला आणि बहिणीला उमेदवारी देण्यात आली आहे. नाशिक व छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीत महायुतीत बिघाडी झाली असून महायुतीतील घटकपक्ष आपल्या सोयीनुसार युती करून निवडणुका लढवणार असल्याचे चित्र आहे. संभाजीनगरमध्ये भाजपसोबत युती करण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळत नसल्याने शिवसेना शिंदे गटात अस्वस्थता आहे. पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, भाजप सकारात्मक प्रतिसाद देत नसेल तर एकनाथ शिंदे युतीसाठी पर्यायी मार्ग काढतील. शिवसेनेने ४१ जागांचा प्रस्ताव दिला होता. सुमारे ८-९ बैठका झाल्या तरी त्यातून ठोस मार्ग निघाला नाही. नाशिक महानगरपालिकेसाठी महायुतीचा जागावाटपाचा तिढा न सुटल्याने महायुतीत फूट पडली असून शिंदे आणि अजित पवार गट एकत्र लढणार असल्याचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ यांनी जाहीर केले.

भाजपने घेतलेल्या निर्णयामुळे आम्हाला स्वतंत्र विचार करावा लागत आहे, असे ते म्हणाले. पुण्यात दोन राष्ट्रवादी एकत्रितरीत्या लढणार आहेत तर भाजप व शिवसेना शिंदे गटाची युती होण्याची शक्यता आहे. पुण्याच्या राजकारणात पक्षांतराचा जोरदार सामना सुरू आहे. काही दिवसांपूर्वी भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला दिलेल्या धक्क्याची परतफेड अजित पवारांनी केली आहे. भाजपच्या काही माजी नगरसेवकांना आणि पदाधिका-यांना त्यांनी सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश दिला. भाजपचे माजी नगरसेवक शंकर पवार, किरण बारटक्के, धनंजय जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अशोक हरणावळ, भाजपचे संदीप ज-हाड, सुनीता गलांडे यांनीही हातात घड्याळ बांधले. भाजपने बंडखोरीची शक्यता लक्षात घेऊन सोमवारी यादी जाहीर न करता उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले. पक्षाने अशा प्रकारे थेट फॉर्म दिल्याने इच्छुकांचा चांगलाच गोंधळ उडाला. पत्ता कट झालेल्या माजी नगरसेवकांनी पक्षाच्या नेत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी जागावाटप व उमेदवार जाहीर करण्यास जाणीवपूर्वक उशीर केल्याचे दिसते. बंडखोरी टाळण्यासाठी हा युक्तिवाद केल्याचे सांगण्यात येत असले तरी त्यामागची कारणे अधिक खोलवर आहेत. एकाच जागेसाठी अनेक इच्छुक, ऐनवेळी आयात उमेदवारांना दिली जाणारी तिकिटे आणि वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणा-या निष्ठावंतांना डावलले जाणे यामुळे नाराजी वाढली. पूर्वीसारखी पक्षांतर्गत शिस्त आज कुठल्याच पक्षात दिसत नाही. कुंपणावर असलेले नेते संधिसाधूपणे पक्षांतर करून तिकिट मिळवतात आणि त्यासाठी विकास व समाजसेवेचे गोंडस लेबल लावले जाते. शेवटच्या क्षणापर्यंत इच्छुकांना 'कामाला लागा' असा संदेश देत प्रचार व खर्चाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली जाते. निर्णय मात्र मोजक्यांच्या हातात राहतो. परिणामी बंडखोरी होते. नाराजी दडपली जाते, पण ती नष्ट होत नाही!

## 'इंडिगो'ची सद्दी संपणार?

भारतीय नागरी विमान वाहतूक क्षेत्रात लवकरच मोठी स्पर्धा पहावयास मिळणार आहे. केंद्र सरकारने तीन नवीन एअरलाईन्सना देशांतर्गत विमान सेवा सुरू करण्यास परवानगी दिली असून यामुळे प्रवाशांना प्रवासाचे नवीन आणि स्वस्त पर्याय उपलब्ध होणार आहेत. नागरी उड्डाण मंत्रालयाने 'अल हिंद एअर', 'फ्लाय एक्स्प्रेस' आणि 'शंख एअर' या कंपन्यांना 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) जारी केले आहे. उत्तर प्रदेशातील 'शंख एअर' २०२६ मध्ये आपले कमर्शियल ऑपरेशन्स सुरू करू शकते. त्यांच्याकडे या पूर्वीच एनओसी उपलब्ध आहे. केरळच्या 'अल हिंद ग्रुप'कडून 'अल हिंद एअर'चे प्रवर्तन केले जात आहे तर 'फ्लाय एक्स्प्रेस'च्या प्रवर्तनाबाबत अजून माहिती मिळालेली नाही. देशातील विमान वाहतूक क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने दोन नवीन एअरलाईन्सना परवानगी देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. सरकारच्या 'उडान' योजनेअंतर्गत स्टार एअर आणि फ्लाय-९१ यासारख्या लहान एअरलाईन्स आधीच कार्यरत आहेत. आता अल हिंद एअर, फ्लाय एक्स्प्रेस, शंख एअरमुळे टियर-२ आणि टियर-३ शहरांची हवाई जोडणी अधिक मजबूत होऊ शकेल.

यामुळे प्रवाशांना अधिक पर्याय, स्पर्धात्मक भाडे आणि चांगली सेवा मिळेल, असा अंदाज आहे. सध्या देशांतर्गत विमान प्रवास करणा-या सुमारे ९० टक्के प्रवाशांकडून इंडिगो आणि टाटा समुहाच्या एअर इंडिया सेवांचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत एखाद्या मोठ्या एअरलाईनमध्ये अडचण निर्माण झाल्यास संपूर्ण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. ही जोखीम कमी करण्यासाठी सरकारने नव्या एअरलाईन्सना परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी नेमके तसे घडले. देशातील सर्वांत मोठी एअरलाईन इंडिगोच्या प्रणालीत बिघाड झाला आणि मोठा गोंधळ उडाला. इंडिगोने ऐनवेळी अनेक उड्डाणे रद्द केली आणि हजारो प्रवाशांना त्याचा फटका बसला. प्रवाशांना तासन्तास विमानतळावर बसावे लागले. अनेक जण आपल्या निर्धारित स्थळी पोहोचू शकले नाहीत. उड्डाणे रद्द झाल्याने तिकिटाचे पैसे परत मिळवण्यासाठी वाद झाले. या घटनेमुळे भारतीय विमान वाहतूक क्षेत्रात मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व किती धोकादायक ठरू शकते ते स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर सरकारने घेतलेला निर्णय योग्यच म्हणावा लागेल. सरकारने तीन नवीन विमान कंपन्यांना एनओसी दिली म्हणजे लगेच उद्यापासून या कंपन्यांच्या विमानातून प्रवास करता येईल, असे नाही.

सरकारने या कंपन्यांना विमानसेवा सुरू करण्याची प्रक्रिया पुढे नेण्याची परवानगी दिली आहे. सरकारकडून एनओसी मिळाल्यानंतर या विमान कंपन्यांना नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) एअर ऑपरेटर प्रमाणपत्र (एओसी) घ्यावे लागेल. नंतर फ्लीट, क्रू, नेटवर्क आणि देखभालीबाबत तयारी करावी लागेल. या प्रक्रियेला अनेक महिने लागू शकतात. या प्रक्रियेत एअरलाईनची आर्थिक रणनिती आणि ऑपरेशनल क्षमता समाविष्ट केल्या जातात. भारतातील विमान वाहतूक बाजारपेठ वेगाने वाढत आहे. नव्या विमान कंपन्यांच्या समावेशामुळे अधिक सुविधा आणि चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल. नवीन कंपन्यांच्या आगमनामुळे स्पर्धा वाढेल. विमानांची निवड करताना प्रवाशांकडे विविध पर्याय उपलब्ध असतील. नवीन विमान कंपन्यांना परवानगी देण्यामागे सरकारचे उद्दिष्ट इंडिगो आणि एअर इंडियावरील अवलंबित्व कमी करणे हे आहे. उत्तर प्रदेशस्थित शंख एअरलाईन्स २०२६ च्या पहिल्या तिमाहीत सुरू होण्याची अपेक्षा आहे. पुढील ३ वर्षात या एअरलाईन्सच्या ताफ्यात २० ते २५ विमाने राहतील, अशी अपेक्षा आहे. देशातील प्रमुख शहरे आणि राज्यांमधील कनेक्टिव्हिटी सुधारण्याचे शंख एअरचे उद्दिष्ट आहे. अल हिंद ही केरळस्थित अल हिंद ग्रुपच्या मालकीची आहे.

या एअरलाईनचे ध्येय प्रादेशिक आणि कमी किमतीची कनेक्टिव्हिटी प्रदान करणे आहे त्यामुळे सामान्य व्यक्तीसाठी विमान प्रवास परवडणारा बनू शकतो. देशात फ्लाय एक्स्प्रेस सुरू झाल्यानंतर कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनापर्यंत सर्व काही व्यावसायिक उद्देशाने वाहतूक करणे सोपे होईल. देशांतर्गत हवाई कार्गोच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ही विमान कंपनी प्रवासी उड्डाणांसाठी एक व्यवहार्य पर्याय म्हणून काम करू शकते. सध्या भारतीय विमान वाहतूक बाजारपेठेच्या सुमारे ९० टक्के हिश्श्यावर इंडिगो आणि एअर इंडिया समुहाचे वर्चस्व आहे.

एकट्या इंडिगोचा बाजारपेठेतील हिस्सा ६५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या दोन बड्या कंपन्यांच्या मक्तेदारीमुळे प्रवाशांना अनेक वेळा मर्यादित पर्यायांचा सामना करावा लागतो. गत काही वर्षात 'गो फर्स्ट' आणि 'जेट एअरवेज'सारख्या कंपन्या आर्थिक संकटामुळे बंद पडल्याने या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली होती मात्र आता नवीन कंपन्या आल्याने विमान वाहतूक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण आहे. वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी देशात विमान ऑपरेटरची संख्या वाढवणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे. नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू म्हणाले,

भारतीय आकाशात जास्तीत जास्त कंपन्यांना प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय आहे त्यामुळे प्रवाशांना उत्तम सेवा आणि वाजवी दरात तिकिटे मिळतील. सरकारचा हा निर्णय कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी क्रांतिकारी ठरू शकतो. प्रवाशांचा फायदा होणार आहे तसेच स्पर्धा वाढल्यामुळे विमान प्रवासाचे दर नियंत्रणात राहतील. कनेक्टिव्हिटी सुधारेल आणि देशातील दुर्गम भागातील शहरांना विमान सेवेने जोडणे सोपे होईल. परवाना मिळालेल्या कंपन्यांना आता विमानांची खरेदी, पायलट-कर्मचा-यांची भरती आणि मोठे नेटवर्क उभारण्यासाठी प्रचंड भांडवलाची गरज भासणार आहे. या कंपन्यांना पुढील काही महिने तांत्रिक आणि आर्थिक बाबींची पूर्तता करावी लागेल. यात विमान देखभाल, वैमानिकांचे प्रशिक्षण आणि रूट मॅपिंगचा समावेश असेल. या प्रक्रियेनंतरच या कंपन्यांची विमाने प्रत्यक्ष आकाशात झेप घेतील. सरकारच्या निर्णयामुळे केवळ मोठ्या शहरांनाच नव्हे तर ग्रामीण भागालाही हवाई नकाशावर स्थान मिळेल. भारताचे विमान वाहतूक क्षेत्र जगातील अन्य कोणत्याही देशापेक्षा अधिक वेगाने विस्तार पावत आहे त्यामुळे अधिक कंपन्या सामावून घेण्याची या क्षेत्राची क्षमता आहे.

## 'बाहुबली'चे यशस्वी उड्डाण

भारतीय अवकाश संशोधन संस्था 'इस्रो'ने ६ हजार १०० किलो वजनाच्या उपग्रहाचे अवकाशात यशस्वी प्रक्षेपण करून नवा इतिहास निर्माण केला आहे. इस्रोच्या 'बाहुबली' अग्निबाणाच्या सहाय्याने हे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८ वाजून ५५ मिनिटे ३० सेकंदांनी श्रीहरीकोटा येथील प्रक्षेपण केंद्रावरून करण्यात आले. या उपग्रहाचे नाव 'ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२' असे आहे. इस्रोने आतापर्यंत प्रक्षेपित केलेल्या उपग्रहांमध्ये हा सर्वाधिक वजनाचा आहे. हा उपग्रह दूरसंचार सेवेसाठी असून तो निम्नकक्षेत परिभ्रमण करणारा सर्वांत वजनदार उपग्रह आहे. या उपग्रहाची निर्मिती अमेरिकास्थित 'एएसटी स्पेसमोबाईल' या खासगी कंपनीने केली आहे. इस्रोचे 'एलव्हीएम ३-एम-६' या अग्निबाणाने या उपग्रहाला पूर्वनिर्धारित कक्षेत सुस्थिर केले आहे. या अग्निबाणाच्या श्रेणीला 'बाहुबली' असे संबोधले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी इस्रोचे अभिनंदन केले असून इस्रोचे हे यश आत्मनिर्भर भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे असे आपल्या संदेशात म्हटले आहे.

पूर्वनिर्धारित कार्यक्रमानुसार या उपग्रहाचे प्रक्षेपण बुधवारी सकाळी ८ वाजून ५४ मिनिटांनी केले जाणार होते. परंतु अवकाशातील परिस्थिती अनुकूल नसल्याने प्रक्षेपण ९० सेकंद विलंबाने करण्यात आले. अवकाशात उपग्रह प्रक्षेपणाच्या मार्गात 'अवकाश कचरा' आढळल्याने तो दूर होईपर्यंत प्रक्षेपण लांबविण्यात आले होते. इस्रोची व्यापारी शाखा 'न्यू स्पेस इंडिया लिमिटेड' आणि अमेरिकेची खासगी उपग्रह निर्मिती कंपनी 'एएसटी स्पेस मोबाईल' यांच्यात झालेल्या करारानुसार या उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले आहे. या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण करून इस्रोने आपला पूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे. यापूर्वी इस्रोने ४ हजार ४०० किलो वजनाच्या उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले होते. या नव्या उपग्रहात अत्यंत आधुनिक अशी दूरसंचार साधने स्थापित करण्यात आली असून त्यामुळे मोबाईलवरून संपर्क साधण्यासाठी जमिनीवर मनोरे(टॉवर्स) असण्याची गरज नाही. मनोराविरहित संपर्क यामुळे शक्य होणार आहे.

तसेच व्हीडीओ कॉल करण्यासाठीही हा उपग्रह उपयुक्त ठरणार आहे. या उपग्रहामुळे ४ जी आणि ५ जी ध्वनी आणि व्हीडीओ कॉल्स शक्य होणार आहेत. स्पेसमोबाईल या खासगी कंपनीने एक महत्त्वाकांक्षी योजना आखली असून या योजनेमुळे मनोराविरहित संपर्क शक्य होणार आहे. ही कंपनी 'आकाशाधारित' (स्पेस बेस्ड) सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्कची स्थापना करणार आहे. हे नेटवर्क व्यापारी आणि प्रशासकीय उपयोगासाठी असेल. तसेच ते ४ जी आणि ५ जी कॉल्स, संदेशवहन, स्ट्रीमिंग आणि विदासेवा (डाटा सर्व्हिस) यांच्यासाठी उपयुक्त असेल. भारताच्या अवकाश क्षेत्रातील कामगिरीतले हे भरीव यश आहे. भारताच्या अवकाश प्रवासातील हा देदीप्यमान क्षण आहे. या उपग्रहामुळे अवकाशातून सामान्य स्मार्टफोनवर थेट हाय-स्पीड इंटरनेट प्रवेश मिळेल. ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२ हा एएसटी स्पेसमोबाईलच्या पुढील पिढीतील संप्रेषण उपग्रह मालिकेचा एक भाग आहे. हा उपग्रह जगभरातील अशा भागात मोबाईल कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी डिझाईन केला आहे जिथे ग्राऊंड नेटवर्क प्रवेश करण्यायोग्य नाही. या उपग्रहात २२३ चौरस मीटर (सुमारे २४००चौरस फूट) फेजड् अँरे अँटेना आहे. ज्यामुळे तो पृथ्वीच्या कक्षेत कमी अंतरावर तैनात केलेला सर्वांत मोठा व्यावसायिक संप्रेषण उपग्रह बनला आहे.

हा उपग्रह सुमारे ६०० किलोमीटर उंचीवर पृथ्वीच्या कक्षेत तैनात केला जाईल. याआधी एलव्हीएम ३ ने चांद्रयान-२, चांद्रयान-३ आणि दोन वनवेब मोहिमा (एकूण ७२ उपग्रह) यशस्वीरीत्या प्रक्षेपित केल्या आहेत. हे रॉकेट भारताच्या अंतराळ क्षमतेचे प्रतीक आहे आणि भविष्यातील गगनयान मानवयुक्त मोहिमेसाठी देखील वापरले जाणार आहे. हे मिशन इस्रोच्या व्यावसायिक प्रक्षेपणासाठी एक नवीन मैलाचा दगड ठरेल. एएसटी स्पेसमोबाईल जगातील पहिले अंतराळ-आधारित सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्क तयार करत आहे, जे स्टारलिंकसारख्या सेवांशी स्पर्धा करेल. ब्ल्यूबर्ड ब्लॉक-२च्या मदतीने स्मार्टफोन व्यावसायिक आणि सरकारी अशा दोन्ही कारणांसाठी थेट उपग्रहांशी कनेक्ट होऊ शकतील. एएसटी स्पेसमोबाईलने सप्टेंबर २०२४ मध्ये ५ ब्ल्यूबर्ड उपग्रह प्रक्षेपित केले आहेत. या कंपनीने जगभरातील ५० हून अधिक मोबाईल ऑपरेटरशी करार केला आहे. 'बाहुबली'च्या यशामुळे एलन मस्कच्या स्पेस एक्सला पर्याय निर्माण झाला आहे. स्पेस मार्केटमध्ये सगळ्यात स्वस्त रॉकेट प्रक्षेपण कोण करतं याकडे जगाचे लक्ष असते. स्पेस एक्स कंपनी एकच रॉकेट पुन्हा पुन्हा वापरून खर्च कमी करते तर भारताची अंतराळ संशोधन संस्था इस्रो कमी खर्चात रॉकेट तयार करते.

त्यामुळे अनेक देश भारताला पसंती देत आहेत. स्पेस एक्सच्या 'फाल्कन ९' रॉकेट लाँचची किंमत सुमारे ५५० ते ५६० कोटी आहे. इस्रोच्या एलव्हीएम ३ रॉकेटच्या एका लाँचची किंमत सुमारे ४०० ते ४५० कोटी आहे. इस्रोचे रॉकेट अवकाशात सुमारे ८ हजार ते १० हजार किलो वजन नेऊ शकते. स्पेस एक्सच्या रॉकेटची क्षमता २२ हजार ८०० किलो आहे. स्पेस एक्सचे रॉकेट जादा वजन नेऊ शकते म्हणून त्याचा 'प्रति किलो' खर्च कमी होतो. त्यामुळे इस्रोचे रॉकेट थोडे महाग वाटू शकते. पण छोटे रॉकेट्स आणि पीएसएलव्हीबाबत भारत अजूनही जगात सर्वांत स्वस्त पर्यायापैकी एक आहे. इस्रोचे एलव्हीएम ३ रॉकेट शंभर टक्के यशस्वी आहे. अवकाशात विश्वास हा पैशापेक्षा जास्त महत्त्वाचा आहे. अवकाशात वजन पाठवण्यासंदर्भात प्रति किलो खर्चात मस्कची कंपनी पुढे असली तरी विश्वासाच्या बाबतीत इस्रोला तोड नाही. इस्रोने सर्वांत वजनदार उपग्रह यशस्वीरीत्या प्रक्षेपित केल्यामुळे सा-या जगाचे लक्ष भारताकडे वेधले गेले आहे. व्यावसायिक प्रक्षेपण क्षेत्रात इस्रोने बाजी मारली याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे.

**printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR**

**मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र). संपादक : शिवाजी बबन खेडकर**

# केवळ मतदानाच्या दिवशी नव्हे तर निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर दक्ष राहणे आवश्यक - अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे

■ **एक दिवसीय प्रशिक्षणात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना कायदेशीर नियमावली व ईव्हीएम यंत्राचे प्रात्यक्षिक**



**पिंपरी :** लोकशाही प्रक्रियेत मतदान हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनावर नागरिकांचा विश्वास अबाधित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी निवडणूक काळात केवळ मतदानाच्या दिवशी पुरते आपले कार्य मर्यादित नसून, संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर दक्ष राहणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणात सर्व शंकांचे निरसन करून, आत्मविश्वासाने निवडणूक कामकाज पार पाडा, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी केले.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात महापालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रारंभिक प्रशिक्षण पार पडले. यावेळी मार्गदर्शन करतांना अतिरिक्त आयुक्त बगाडे बोलत होते.

तीन सत्रात पार पडलेल्या या प्रशिक्षणामध्ये प्रथम सत्रात चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात संगणकीय सादरीकरणाद्वारे मतदान प्रक्रियेचे सविस्तर प्रशिक्षण अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आले. तर द्वितीय सत्रात प्रात्यक्षिकाद्वारे ईव्हीएम हाताळणीचे प्रशिक्षणही अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आले. या प्रशिक्षणास अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य प्रशिक्षक सतीश मेहेर, अविनाश वाळुंज, रामेश्वर पवार, नरेंद्र बंड यांच्यासह संबंधित समन्वय अधिकारी तसेच मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सह आयुक्त मनोज लोणकर म्हणाले, निवडणूक कामकाजात पारदर्शकता व शिस्त अत्यंत महत्त्वाची आहे. मतदान केंद्रावर मतदार ओळख प्रक्रिया, गोपनीयतेची अंमलबजावणी व आचारसंहितेचे पालन याबाबत तसेच मतदानाच्या दिवशी उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी व त्यावरील उपाययोजनांची सविस्तर माहिती सर्वांनी करून घ्यावी. तसेच मतदानानंतरची कागदपत्रे, अहवाल सादरीकरण व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय कसा ठेवावा यावरही भर देऊन सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने व दक्षतेने काम करून निवडणूक प्रक्रिया यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

उप आयुक्त पंकज पाटील म्हणाले, पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ही लोकशाहीची अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून ती यशस्वी करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांच्या खांद्यावर आहे. मतदान केंद्रावर होणारी प्रत्येक कृतीची नियमानुसार नोंद होणे आवश्यक आहे. शिस्त, शांतता आणि निष्पक्षता या निवडणूक प्रक्रियेच्या मूलभूत बाबी असून त्यांचे काटेकोर पालन होणे गरजेचे आहे. कोणतीही चूक किंवा निष्काळजीपणा टाळून प्रत्येक टप्प्यावर दक्षतेने काम केल्यास व निवडणूक कायदे आणि मार्गदर्शक सूचनांची अचूक अंमलबजावणी केल्यास नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल.

**ईव्हीएम मशीनचे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना प्रात्यक्षिक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ईव्हीएम मशीनद्वारे घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रशिक्षणाच्या दुसऱ्या सत्रात निवडणूक प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम यंत्रांची रचना, कंट्रोल युनिट व बॅलेट युनिटची कार्यपद्धती याबाबत मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर माहिती देण्यात आली. मतदान सुरू होण्यापूर्वी मॉक पोल घेण्याची अचूक प्रक्रिया, मतदानादरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर तत्काळ उपाययोजना तसेच मतदान संपल्यानंतर ईव्हीएम यंत्रे सुरक्षितरीत्या सील करून सुपूर्द करण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या ईव्हीएम प्रात्यक्षिक सत्रासाठी आयटीआयचे जितेंद्र काथवटे, अरुण बांबळे, प्रवीण कोळेकर, योगेश गरड, किशोर शिंदे, संजीव आनंदकर, गणेश सुर्वे, शिवदास वाघमारे, जयवंत अनपट आणि अमोल शिंदे यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

# बूथ लेव्हल ऑफिसर यांना निवडणूक विषयक कामकाजाबाबत केले मार्गदर्शन

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत कार्यरत बूथ लेव्हल ऑफिसर यांच्यासाठी निवडणूक विषयक कामकाजाबाबत मार्गदर्शन बैठक डॉ. हेडगेवार भवन , निगडी येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बूथ लेव्हल ऑफिसर यांची भूमिका व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी घाटगे यांनी बूथ लेव्हल ऑफिसर यांना मतदार केंद्राची माहिती संकलन व अद्ययावत ठेवणे, मतदान केंद्रांवरील प्राथमिक सुविधांचा आढावा घेणे, शाळांमध्ये होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत की नाही याची खातरजमा करणे, मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राची माहिती देणे तसेच मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेण्याबाबत मार्गदर्शन केले.

यासोबतच मतदारांना मतदान यंत्र (ईव्हीएम) वापराबाबत योग्य माहिती देणे, मतदान प्रक्रिया समजावून सांगणे आणि मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवरही त्यांनी भर दिला. या बैठकीस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश डोईफोडे, निवेदिता घार्गे यांच्यासह संबंधित अधिकारी व बूथ लेव्हल ऑफिसर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्यासाठी ३ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ

**पिंपरी :** महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने केंद्रनिहाय मतदार यादी जाहीर करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मतदान केंद्र निहाय याद्या प्रसिद्ध करण्यासाठी ३ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने सर्व महापालिकांना दिलेल्या सुचनेनूसार दुबार मतदार व मतदान केंद्रनिहाय मतदार यादीचे कंट्रोल चार्ट संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी



२७ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. तर मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी ३ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापुर्वी राज्य निवडणूक आयोगाने मतदान केंद्रनिहाय याद्या प्रसिद्ध करण्यासाठी २७ डिसेंबर २०२५ तारीख निश्चित केली होती.

# ऐतिहासिक धम्मभूमी वर्धापन दिनानिमित्त मुस्लिम बांधवांकडून भीम अनुयायांची सेवा

**देहूरोड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतील समता, बंधुभाव आणि एकता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने, ऐतिहासिक धम्मभूमी वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'मुस्लिम विकास विचार मंच' च्या वतीने एका विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. बुधवारी, २४ डिसेंबर रोजी धम्मभूमीवर येणाऱ्या सर्व अनुयायांसाठी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत मोफत चहा वाटप करण्यात आले.

ऐतिहासिक धम्मभूमी ही क्रांतीची आणि ऊर्जेची भूमी आहे. या पवित्र ठिकाणी अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या भीम अनुयायांचे स्वागत करण्यासाठी आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्यासाठी मुस्लिम विकास विचार मंच नेहमीच सक्रिय असतो.


अध्यक्ष रज्जाक साहेबलाल शेख यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधानाच्या माध्यमातून बंधुभावाची शिकवण दिली आहे. तोच वारसा पुढे नेत, मुस्लिम समाजाच्या वतीने भीम बांधवांचे प्रेमाने स्वागत करून समाजात सलोखा जपण्याचा हा आमचा एक छोटासा प्रयत्न आहे.

या स्तुत्य उपक्रमावेळी मुस्लिम विकास विचार मंचचे अध्यक्ष रज्जाक शेख, रफिक शेख, 'बहुजन संघटक' चॅनलचे संपादक राहुल खांडेकर, गफूर शेख, अरुण जगताप, बापूसाहेब गायकवाड, संकेत जगताप, गौस सुनार, अन्वरअली शेख, शफी सय्यद, जाहिद शिकीलकर, जाकिर सय्यद, सचिन जोगदंड आणि शाहिद शेख यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. धम्मभूमीवर येणाऱ्या शेकडो अनुयायांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. यावेळी बुद्ध विहार कृती समितीचे अध्यक्ष भीमपुत्र टेक्सास गायकवाड आणि श्रीमती नारायण देवी अगरवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ईश्वर अगरवाल यांनी चहा वाटप केंद्राला भेट देऊन या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. मुस्लिम बांधवांनी दाखवलेल्या या प्रेम आणि आपुलकीबद्दल सर्व स्तरातून आभार व्यक्त केले जात आहेत.

# डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यावर महापालिकेचा भर - आयुक्त श्रावण हर्डीकर

■ **पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या मतदान जनजागृती चित्रफितीचे आयुक्तांच्या हस्ते अनावरण**

**पिंपरी :** लोकशाहीची खरी ताकद ही नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून असते. मतदान हा केवळ हक्क नसून लोकशाहीप्रती आपले कर्तव्य आहे. प्रत्येक मत महत्त्वाचे असून त्याच्या माध्यमातून नागरिक आपल्या शहराच्या आणि प्रशासनाच्या भवितव्याची दिशा ठरवतात. त्यामुळे कोणताही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये, लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले.



राज्य निवडणूक आयोग व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मतदान जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या मतदान जनजागृती चित्रफितीचे अनावरण आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांच्यासह उपायुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले, 'स्वीप कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेली ही चित्रफित नागरिकांपर्यंत सोप्या, प्रभावी आणि भावनिक पातळीवर पोहोचणारे माध्यम ठरेल. युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच प्रथमच मतदान करणारे मतदार यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांची आवश्यकता आहे. डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यावर महापालिकेचा भर राहील. या चित्रफितीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होईल,' असा विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत पार पाडण्याची सामूहिक जबाबदारी

■ **सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवांकडून विजयस्तंभाच्या प्रत्यक्ष जागेवर जाऊन तयारीची पाहणी**

**पुणे** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या मूल्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत पार पाडणे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी प्रशासन, सामाजिक संघटना व नागरिकांनी परस्पर समन्वय साधून सोहळा हा यशस्वी करावा. प्रशासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे अनुयायांनी पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले.

हवेली तालुक्यातील पेरणे फाटा येथील विजयस्तंभ परिसरास भेट देऊन १ जानेवारी २०२६ रोजी साजरा होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने विविध विभागांकडून करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)चे महासंचालक सुनील वारे, समाजकल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, पोलीस अधीक्षक संदीप गिल, पुणे शहरचे पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, उत्पादक शुल्क अधीक्षक अतुल कानडे, समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता अनुराधा भंडारे, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, गट विकास अधिकारी शेखर शेलार, बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड तसेच विजयस्तंभ स्मारक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. कांबळे म्हणाले की, देशभरातून मोठ्या संख्येने अनुयायी १ जानेवारी रोजी विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी पेरणे फाटा येथे येतात. यंदा गेल्या वर्षीपेक्षा विविध कारणांनी वाढणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन अनुयायांना आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे. येणाऱ्या अनुयायांना कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता घेऊन सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले. विविध विभागांकडून सादर करण्यात आलेल्या मागण्यांबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे प्राप्त प्रस्तावांना आजच मान्यता देण्यात येईल. आणखी काही मागण्या असल्यास तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही डॉ. कांबळे यांनी दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विजयस्तंभास दिलेल्या भेटीला सन २०२७ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत असून, या पार्श्वभूमीवर भविष्यात येणाऱ्या अनुयायांची वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच दीर्घकालीन पूर्वतयारी करावी, असेही त्यांनी सांगितले.

# विमानतळ प्रकल्पबाधित गावातील प्रतिनिधींशी मुख्यमंत्र्यांनी साधला संवाद

■ **पुरंदर विमानतळामुळे पुणे परिसरातील औद्योगिक विकासाला प्रोत्साहन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

**मुंबई** - पुण्यात अनेक उद्योग येण्यास इच्छुक असून त्यासाठी पुरंदर विमानतळ महत्वाचे ठरणार आहे. या विमानतळामुळे पुणे व परिसरातील औद्योगिक विकासाला प्रोत्साहन मिळेल. हे केवळ प्रवासी विमानतळ नसून कार्गो विमानतळही असल्याने नाशवंत मालाच्या व्यापारासाठी विशेष उपयुक्त ठरणार आहे. या प्रकल्पामुळे पुरंदर व परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होणार असून पुण्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी) किमान दोन टक्क्यांची वाढ होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

पुरंदर विमानतळ प्रकल्पाच्या बाधित सात गावातील ग्रामस्थांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज संवाद साधला. यावेळी माजी मंत्री विजय शिवतारे, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह पुरंदर विमानतळाच्या परिसरातील बाधित सात गावांचे ग्रामस्थ उपस्थित होते.

**भूसंपादनाचा जास्तीत जास्त मोबदला देणार**

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुरंदर येथील विमानतळ हे महाराष्ट्र आणि पुण्याच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. हा प्रकल्प व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा सखोल विचार करून या विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीसाठी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

पुरंदर येथील एरोसिटी प्रकल्पामध्ये टीडीआर संदर्भातील सर्व लाभ दिले जातील. प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मुलांना शंभर टक्के नोकरीत प्राधान्य दिले जाईल. भूसंपादनाचा दर अंतिम झाल्यानंतर त्या भागातील युवकांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू करून उद्योगांना आवश्यक कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल. तसेच प्रकल्पासंदर्भातील पूर्वी झालेल्या आंदोलनातील दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

**पुनर्वसनाला सर्वोच्च प्राधान्य**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुरंदर प्रकल्पासाठी बाधित होणाऱ्या शेतकरी व नागरिकांच्या योग्य पुनर्वसनाला सर्वोच्च प्राधान्य आहे. शेतकऱ्यांना व त्यांच्या पुढील पिढीला संरक्षण मिळेल, याचा विचार करून मूळ जमिनीच्या दरापेक्षा जास्त दर देण्याचा विचार करण्यात येईल. त्यासाठीच रेडिरेकनर नुसार भूसंपादन न करता वाटाघाटीद्वारे भूसंपादनाचा दर ठरविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

# सहभागी प्रत्येक विद्यार्थी हा विजेताच : श्री.संजय कुमार राष्ट्रीय कला उत्सवाचा जल्लोषपूर्ण समारोप

**पुणे** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात कलेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने पार पडलेला हा कला उत्सव येथे आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रोत्साहन देणारा ठरला आहे. काहींना या ठिकाणी पुरस्कार मिळाले आहेत परंतु यामध्ये सहभागी झालेला प्रत्येक विद्यार्थी आज जिंकलेला असून तो विजेताच आहे, अशा शब्दात भारत सरकारच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. राष्ट्रीय कला उत्सव २०२५ च्या समारोप सोहळ्यात ते बोलत होते. कलेला प्राधान्य देणाऱ्या या उत्सवाच्या आयोजनासाठी त्यांनी महाराष्ट्र शासनाचे, एनसीईआरटी आणि यशदाचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त प्रश्न विचारण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहन द्यावे जेणेकरुन विद्यार्थी आपल्या कल्पकतेने शिकतील असेही संजय कुमार यावेळी म्हणाले.

यावेळी केंद्रीय शिक्षा मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव श्री. आनंदराव पाटील, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. रनजीत सिंह देओल, शिक्षण आयुक्त श्री. सचिन्द्र प्रताप सिंह, एनसीईआरटीचे संचालक दिनेश प्रसाद सकलानी, एससीईआरटीचे संचालक श्री. राहूल रेखावार, एनसीईआरटीच्या विभाग प्रमुख प्रा. ज्योत्स्ना तिवारी व शिक्षण विभागातील मान्यवर अधिकारी उपस्थित होते. एनसीईआरटी, नवी दिल्लीद्वारे या उत्सवाचे २०१५ पासून दरवर्षी आयोजन केले जाते.

एकमेकांच्या कला संस्कृतीची देवाण घेवाण करणे हाच खरा एक भारत श्रेष्ठ भारत आहे. आगामी काळात तुम्ही ही प्रतिभा जगभरात घेऊन जाल आणि यशस्वी व्हाल अशी अपेक्षा यावेळी केंद्रीय शिक्षा मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव श्री. आनंदराव पाटील यांनी व्यक्त केली.

## जिल्ह्यातील उर्दू शाळांमध्ये अल्पसंख्याक हक्क दिन साजरा

**पुणे** : जिल्ह्यात पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच ग्रामीण भागातील उर्दू माध्यमांच्या शाळांमध्ये १८ डिसेंबर २०२५ रोजी अल्पसंख्यांक दिन साजरा करण्यात आला.

पुणे महानगरपालिकेअंतर्गत शिक्षण हक्क मंचचे संस्थापक अध्यक्ष मतीनभाई मुजावर यांच्या माध्यमिक शिक्षण विभागातील उर्दू माध्यमाच्या सर्व शाळांना एकत्र करून अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यात आला. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत डॉ. अल्लामा इकबाल उर्दू प्राथमिक शाळा कासारवाडी, आला हजरत इमाम अहमद रजा उर्दू प्राथमिक शाळा नेहरुनगर, उर्दू प्राथमिक शाळा, खराळवाडी, जाधववाडी चिखली येथे साजरा करण्यात आला.

# विजयस्तंभ पेरणेफाटा येथील कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीत बदल

**पुणे** : विजयस्तंभ पेरणेफाटा येथील कार्यक्रमाच्या पार्श्वभुमीवर पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत राहण्याकरिता ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते १ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात बदल करण्याबाबतचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

चाकण ते शिक्रापूर-शिक्रापूर ते चाकण या दोन्ही बाजुकडील वाहतुकीस सर्व प्रकारच्या खाजगी चालकांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. या मार्गावर अनुयायांच्या बसेसना प्रवेश देण्यात येणार आहे. तथापि अनुयायांच्या कार, जीप आदी हलक्या वाहनांना प्रवेश असणार नाही.

चाकण आळंदी फाटा, भारतमाता चौक, मोशी चौक, पांजरपोळ चौक येथून आळंदीकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या खाजगी जड अवजड, मल्टी ॲक्सल वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

मुंबईकडून अहिल्यानगरकडे जाणाऱ्या सर्व प्रकारची (जड वाहने, माल वाहतूक (टेम्पो,ट्रक) वाहने वडगाव मावळ-एचपी चौक म्हाळुंगे-वासोली फाटा किंवा वाघजाई नगर मार्गे -बिरदवडी गाव-रोहकल फाटा-पुणे नाशिक रोड-खेड-मंचर नारायणगाव- आळेफाटा मार्गे अहिल्यानगर येथे जातील. खाजगी हलकी वाहने वडगाव मावळ येथून तळेगाव चाकण रोडने चाकण चौक-खेड- पाबळ -शिरुर मार्गे अहिल्यानगर येथे जातील. आळंदी, कोयाळी आदीमार्गे रसिका हॉटेल चौकात येणाऱ्या सर्व प्रकारच्या खाजगी वाहनांना शिक्रापूर दिशेने जाण्यास बंदी करण्यात येणार असून ही खाजगी वाहने चाकण मार्गे इच्छितस्थळी जातील.

मुंबईकडून जुन्या मुंबई पुणे महामार्गाने सेंट्रल चौक देहूरोडमार्गे निगडी-पिंपरी चिंचवड बाजुकडे जाणाऱ्या जड अवजड वाहनांना मनाई करण्यात येणार असून या मार्गावरील वाहतूक सेंट्रल चौकातून मुंबई-बंगळरु महामार्गाने सरळ वाकड नाका चांदणी चौकमार्गे इच्छितस्थळी जातील. मुंबईकडून एक्सप्रेस महामार्गाने पुणे बाजुकडे जाणाऱ्या जड अवजड वाहनांना उर्से टोलनाका येथुन मुंबई-बंगळरु महामार्गाने मुकाई चौक सेंट्रल चौक मार्गे निगडी-पिंपरी चिंचवड बाजुकडे जाण्यास मनाई करण्यात येणार असून या मार्गावरील वाहने वाकड नाका व राधा चौक येथुन पुणे बाजुकडे जातील.

चाकण, म्हाळुंगे, मरकळ, तळेगाव आदी एमआयडीसीमधील जड अवजड वाहनांच्या अनुयायांच्या मार्गावर येण्यास मनाई करण्यात येत आहे. आळंदी मरकळ लोणीकंदकडे जाणाऱ्या व येणाऱ्या खाजगी हलकी, जड अवजड वाहनांना प्रवेश बंदी असेल. या मार्गावरील वाहने अलंकापुरम चौक (तापकीर चौक) डावीकडे वळून गोडावुन चौक मार्ग, चऱ्होलीफाटा देहूफाटा डावीकडे वळून नाशिक हायवेवरुन, चऱ्होली फाटा देहूफाटा चाकण चौक माजगाव एमआयडीसी चाकण मार्गे तसेच मरकळ एमआयडीसी, सोळु, धानोरेकडून येणारी हलकी व जड अवजड वाहने मरकळ गाव येथून डावीकडे वळून कोयाळी मार्गे रसिका हॉटेल चौकातून चाकण येथे जावून पुढे इच्छितस्थळी जातील,

**विजयस्तंभ पेरणेफाटा येथे अभिवादनाकरिता जाणाऱ्या अनुयायांच्या वाहनांकरीता वाहतुकीत बदल**

नाशिककडून येणाऱ्या अनुयायांच्या बसेस चाकण मार्गे शिक्रापुर वाहनतळ तसेच मुंबईकडून जुन्या मुंबई-पुणे महामार्गाने येणाऱ्या अनुयायांच्या बसेस वडगाव फाटा-म्हाळुंगे-चाकण मार्गे शिक्रापूर वाहनतळाकडे जातील.

जुन्या मुंबई-पुणे महामार्गाने येणारी अनुयायांची हलकी वाहने वडगाव फाटा-म्हाळुंगे-चाकण चौक-डावीकडे वळून- आळंदी फाटा,भारतमाता चौक, मोशी चौक-आळंदी-मरकळ-तुळापूरमार्गे लोणीकंद वाहनतळाकडे जातील. मुंबईकडून एक्सप्रेस महामार्गाने येणारी अनुयायांची हलकी वाहने उर्से टोलनाका येथून डावीकडेवळून वडगाव फाटा- म्हाळुंगे- चाकण चौक -आळंदी फाटा,भारतमाता चौक,मोशी चौकमार्गे आळंदी मरकळ तुळापुर मार्गे लोणीकंद वाहनतळ तसेच मुंबईकडून एक्सप्रेस हायवेने येणारी अनुयायांची हलकी वाहने मुकाई चौक मार्गे-सेंट्रल चौक -नाशिक फाटा मार्गे वाहनतळ ठिकाणी जातील.

नाशिककडून नाशिक-पुणे महामार्गाने येणारी अनुयायांची कार, जीप आदी हलकी वाहने चाकण चौकातून डावीकडे न वळता सरळ पुढे जाऊन आळंदी फाटा किंवा भारत माता चौक किंवा मोशी चौक, पांजरपोळ चौक या ठिकाणावरुन डावीकडे वळून आळंदी मरकळ मार्गे तुळापुरवरुन पुढे लोणीकंद येथे वाहनतळ ठिकाणी जातील. (मरकळ गाव, इंद्रायणी नदी पुलावर ८ फुट उंचीवर लोखंडी ओव्हरहेड बॅरिकेट लावले असल्याने त्यापेक्षा जास्त उंचीची वाहने तेथुन जावू शकणार नाहीत त्यापेक्षा कमी उंचीच्या फक्त अनुयायी यांच्या वाहनांना प्रवेश दिला जाईल.)

पुणे शहरातून विश्रांतवाडी चौक तसेच आळंदी फाटा या ठिकाणावरुन आळंदीच्या दिशेने अनुयायांची वाहनास मज्जाव करण्यात आला असून ही वाहने वाघोली मार्गे लोणीकंदकडे वाहनतळाच्या दिशेने जातील. हा आदेश अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड,पोलीस वाहने, रुग्णवाहीका, आदी) अनुयायांची वाहनेखेरीज करून तात्पुरत्या स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात आले असून नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले आहे.

# पिंपरी-चिंचवड येथे दुचाकी वाहनांसाठी एनए नवीन मालिका सुरू

■ **आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी आगाऊ अर्ज व लिलाव प्रक्रिया जाहीर**

**पुणे** : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी एनए ही नवीन नोंदणी क्रमांक मालिका लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

नव्याने सुरू होणाऱ्या दुचाकी एनए मालिकेतील आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्याकरिता इच्छुक वाहनमालकांनी विहित नमुन्यात अर्ज करून तीनपट शुल्क भरावे. यासाठी दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० या कार्यालयीन वेळेत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

तसेच दुचाकी वाहनांसाठी उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्याकरिता दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० या वेळेत विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारण्यात येतील.

सदर अर्ज प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड (नवीन इमारत, मोशी) येथील नवीन वाहन नोंदणी विभागात डीडी, पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतींसह सादर करावेत. डिमांड ड्राफ्ट DY. R.T.O., Pimpri Chinchwad यांच्या नावे पुणे येथील राष्ट्रीयीकृत अथवा अनुसूचित बँकेचा असावा. अर्जदाराचा आधारकार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक देणे आवश्यक आहे.

चारचाकी वाहनांसाठी अर्जदारांची यादी दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. लिलावासाठी अधिक रकमेचा डीडी सादर करावयाचा असल्यास तो दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० पर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लिफाफे उघडून सर्वाधिक रकमेचा डीडी सादर करणाऱ्या पात्र अर्जदारास पसंतीचा नोंदणी क्रमांक वितरित करण्यात येईल.

दुचाकी वाहनांसाठी अर्जदारांची यादी दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. लिलावासाठी अधिक रकमेचा डीडी दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० पर्यंत सीलबंद पाकिटात सादर करावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता संबंधित अर्जदारांसमोर लिलाव प्रक्रिया पार पडेल.

वाहन क्रमांक आरक्षित झाल्याचा संदेश मोबाईलवर प्राप्त झाल्यानंतर पाचव्या दिवशी पावती कार्यालयातून घेणे आवश्यक आहे. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलता येणार नाही. राखीव दिनांकापासून १८० दिवसांच्या आत वाहन नोंदणीसाठी सादर न केल्यास तो क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेली फी शासनजमा होईल. कोणत्याही परिस्थितीत नोंदणी क्रमांकासाठी भरलेली फी परत अथवा समायोजित केली जाणार नाही, असे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.